## टिळक आयुर्वेद महाविद्यालय व शेठ ताराचंद रामनाथ धर्मार्थ आयुर्वेदीय रुग्णालय, पुणे योगसप्ताह - योगदिन साजरा

टिळक आयुर्वेद महाविद्यालय व शेठ ताराचंद रामनाथ धर्मार्थ आयुर्वेदीय रुग्णालय, पुणे येथील स्वस्थवृत्त व योग विभागातर्फे केंद्र शासन, राज्य शासन, आरोग्य विज्ञान विद्यापीठ, विश्व विद्यालय अनुदान आयोग यांच्या सूचनेनुसार दि.**२१ जून २०१८ आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग सप्ताह १४ जून २०१८ ते २० जून २०१८** या कालावधीत आयोजित करण्यात आला.

सदर सप्ताहाचे संयोजन योगविभागाचे प्रमुख डॉ.मिहीर हजरनवीस यांनी केले. योगसप्ताहामध्ये पुढीलप्रमाणे कार्यक्रम घेण्यात आले -

- योग प्रात्यक्षिक शिबिरे,
- योग विषयक व्याख्याने व प्रात्यक्षिके,
- वक्तृत्व, निबंध व सूर्यनमस्कार समंत्र प्रात्यक्षिक स्पर्धा,
- योग दिंडी अशा बहुविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

सप्ताहामध्ये 'जीवनशैलीशी निगडीत आजारांवर योगोपचार' या विषयावर योगतज्ज्ञ हेमा शहा यांचे व्याख्यान व शुध्दिक्रीयांची प्रात्यक्षिके झाली.

दि.१९ जून २०१८ रोजी वैद्यराज नारायण शंकर परचुरे यांच्या पुण्यतिथीनिमित्त योगसप्ताहामध्ये 'तणावमुक्ती जीवनासाठी योगनिद्रा' या विषयावर डॉ.रेणुका कुलकर्णी यांचे समर्पक व्याख्यान व प्रात्यक्षिके झाली. सदर कार्यक्रमासाठी शेठ ताराचंद रुग्णालयाचे मॅनेजिंग ट्रस्टी डॉ.सुहास परचुरे उपस्थित होते. त्यांनी त्यांच्या वडीलांच्या पुण्यतिथीच्या दिवशी यशस्वी विद्यार्थ्यांना शैक्षणिक पारितोषिके प्रदान केली व उपस्थितांना योग विषयक मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य व रुग्णालयाचे

अधिक्षक डॉ.सदानंद वि.देशपांडे यांनी योग दिनाचे महत्व सांगून सर्वांना नियमितपणे योग करण्याचे आवाहन केले.  रुग्णालयाच्या उपअधिक्षक डॉ.कल्याणी भट, व योग विभागाच्या समन्वयक डॉ.रेखा उपासनी यांनी नियमितपणे चार बॅचेस मध्ये योग प्रात्यक्षिके ताराचंद रुग्णालयात घेतली जातात अशी माहिती दिली. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.सरोज पाटील व निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.प्रियदर्शनी निपाणीकर यांनी उपस्थितांचे योगाद्वारे प्रबोधन केले.

दि.२० जून २०१८ रोजी योग शास्त्राचा प्रचार व प्रसार करण्याच्या दृष्टीने योगदिंडी महाविद्यालयाचे प्राचार्य  डॉ.सदानंद वि.देशपांडे व रुग्णालयाचे मॅनेजिंग ट्रस्टी डॉ.सुहास परचुरे यांच्या समवेत अध्यापक, विद्यार्थी, डॉक्टर्स, रुग्णालयीन कर्मचारी यांनी बहुसंख्येने सहभाग घेऊन 'करा योग व्हा निरोग' या घोषणांनी ताराचंद रुग्णालयाच्या परिसरात योगविषयक शोभायात्रा काढली व योगाचा प्रचार व प्रसार केला.

दि.२१ जून २०१८ रोजी मा.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानुसार ताराचंद रुग्णालयात सकाळी ६.३० ते ८.०० या वेळात आयुष संचालनालयाच्या मार्गदर्शक तत्वानुसार योगप्रात्यक्षिके तेजश्री पेंडसे व वैशाली चौगुले या योगशिक्षकांनी उपस्थितांकडून करवून घेतली.  या प्रात्यक्षिकांमध्ये प्राचार्य डॉ.सदानंद वि.देशपांडे, उपअधिक्षक डॉ.कल्याणी भट, समन्वयक डॉ.मिहीर हजरनवीस, उपप्राचार्य डॉ.सरोज पाटील, प्राध्यापक वर्ग व विद्यार्थी बहुसंख्येने सहभागी झाले होते.